MHOS130000732026

**दिवाणी किरकोळ अर्ज/08/2026**
**सुशिला महादेव माळी वि. निरंक**
**निशाणी क्र.१ खाली आदेश**

प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार क्र. १ ते ४ यांनी मुंबई नियमन कायदा १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत दाखल केला आहे.

२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे आहे की, महादेव दशरथ माळी हे दिनांक ०८.०५.२०२५ रोजी भूम, ता. भूम, जि. धाराशिव येथे मयत झाले आहेत. मयत महादेव यांना अर्जदार क्र.१ ही पत्नी, अर्जदार क्र.२ व ३ ही मुले व अर्जदार क्र.४ ही आई असे वारस असून, अर्जदारांशिवाय इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदारांना ते मयतांचे कायदेशीर वारस म्हणून ओळखण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांनी प्रस्तुत अर्ज दाखल करून त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र मिळण्याची विनंती केली आहे.

३. प्रस्तुत प्रकरणी, अर्जदारांच्या अर्जाच्या पुष्ट्यर्थ दैनिक 'संघर्ष' या वर्तमानपत्रामध्ये दिनांक ०५.०२.२०२६ रोजी अर्जदारांच्या मागणीसंबंधी जाहीर प्रगटन (नि.क्र.१०) प्रकाशित करून, तसेच संबंधित नगर परिषद कार्यालय, तहसील कार्यालय आणि न्यायालयीन दैनिक नोटीस बोर्डवर जाहीरनामा गोषवारा (नि.क्र.७) बजावणी करून अर्जावर आक्षेप मागविण्यात आला.

४. अर्जदार क्र. ३ याने त्याच्या अर्जाच्या पुष्ट्यर्थ स्वत:चे पुराव्याकामी शपथपत्र (नि.क्र.११) दाखल केले आहे. तसेच कागदोपत्री पुरावा म्हणून मयत महादेव दशरथ माळी यांचे मृत्यू प्रमाणपत्र (नि.क्र.१२) प्रत दाखल केली आहे. अर्जदारांनी नि.क्र.१३ वर पुरसिस देऊन पुरावा बंद केला आहे.

५. अर्जदारांतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. के. एस. साबळे यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच अभिलेखावरील दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले.

६. सदरचा अर्ज निकाली काढतांना मयताचे कायदेशीर वारस कोण आहेत हे तपासणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने निशाणी क्र.११ वरील सरतपासातील शपथपत्राआधारे दाखल केलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता, अर्जदाराने अर्जातील कथनांची पुनरावृत्ती करुन अर्जाला पुष्टी देणारा पुरावा दिलेला आहे. तसेच, कागदोपत्री पुराव्यामध्ये मयताच्या मृत्यू प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता, महादेव दशरथ माळी हे दिनांक ०८.०५.२०२५ रोजी मयत झाल्याचे निष्पन्न होते. तसेच अर्जदारांच्या मागणीबाबत नि.क्र.१० प्रमाणे दैनिक वर्तमानपत्रामधील जाहीर प्रगटन व नि.क्र.७ प्रमाणे गोषवारा प्रसिध्द करुन अर्जावर आक्षेप मागविण्यात आला. परंतू, सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द होऊनही अर्जदारांच्या मागणीबाबत मुदतीमध्ये कोणीही हरकत वा आक्षेप दाखल केलेला नाही. त्यामुळे, अर्जदारांचा पुरावा हा विना आव्हानित राहिला.

७. एकंदरीत, अभिलेखावर उपलब्ध असलेली कागदपत्रे व पुरावा यांचा विचार करता, मयताचे अर्जदार क्र. ही पत्नी, अर्जदार क्र. २ व ३ ही मुले व अर्जदार क्र. ४ ही आई असल्याचे दिसून येते. वर नमूद केल्याप्रमाणे अर्जदार हे मयतांचे हिंदू वारसा कायदा, अनुसूची १ नुसार कायदेशीर वारस आहेत, त्यामुळे अर्जदारांच्या हक्कात वारस दाखला देण्यास कोणतीही कायदेशीर बाधा दिसून येत नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>-: आ दे श :-</u>**

| | |
|---|---|
| १. | अर्जदारांचा अर्ज मंजुर करण्यात येतो. |
| २. | मयत महादेव दशरथ माळी यांचे अर्जदार क्र.१. सुशिला भ्र. महादेव माळी, २. स्नेहल पि. महादेव माळी, ३. संस्कार पि. महादेव माळी, ४. राजाबाई भ्र. दशरथ माळी हे कायदेशीर वारस आहेत असे घोषित करण्यात येते. |
| ३. | येणेप्रमाणे अर्जदारांना न्यायालयीन शुल्क भरलेनंतर वारस प्रमाणपत्र देण्यात यावे. |

Note below heirship certificate as per Para 312 of Civil Manual :
" The person, to whom this certificate is granted, or his representative, is required, within six months from the date of this certificate, or within such further time as the Court may from time to time appoint, to exhibit in Court a full and true inventory of all the property and credits in his possession under this certificate, and also, within one year from the same date or within such further time as the Court may from time to time appoint, to render to the Court a true account of the said property and credits, showing the assets which have come to his hands and the manner in which they have been applied or disposed off."

---

AMRAPALI BABURAO JONDHALE
Digitally signed by AMRAPALI BABURAO JONDHALE
Date: 2026.04.22 17:05:53 +0530

दिनांक : २२.०४.२०२६ (**श्रीमती ए. बी. जोंधळे**)
ठिकाण : भूम. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भूम.

---

## C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. S. Hingmire, (Grade-III) |
| Court | :- | Jt. C.J.J.D. & J.M.F.C. Bhoom |
| Date | :- | 22.04.2026 |
| Order signed by the Presiding officer on | :- | 22.04.2026 |
| Order uploaded on | :- | 22.04.2026 |